**Shikshan Mandal Karad's**

# Mahila Mahavidyalay, Karad

## Activity Report

## Academic Year 2022-23

**Date** : २६ नोव्हेंबर २०२२

**Department / Committee** : IQAC विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**Title of Activity / Programme** : भारतीय संविधान दिन / Constitution Day

**Short description of activity/programme:**

शिक्षण मंडळ,कराड संचालित महिला महाविद्यालय,कराड मधील IQAC विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या सयुंक्त विद्यमाने "भारतीय संविधान दिन" हा दि. २५ नोव्हेंबर २०२२ व २६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत विविध उपक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला. विद्यार्थिनीमध्ये संविधानाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने व संविधानाचे महत्व समजण्यासाठी भारतीय संविधान जनजागृती पर मार्गदर्शनपर व्याख्यान, भारतीय संविधान उद्देशपत्रीकेचे सामुहीक वाचन व शपथ, संविधान प्रबोधनपर जनजागृती फेरी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. होते. अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करून "भारतीय संविधान दिन" हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचा अहवाल पुढीलप्रमाणे .....

### दि. २५ नोव्हेंबर २०२२ व २६ नोव्हेंबर २०२२

| अ.क्र. | दिनांक | आयोजित कार्यक्रमाचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | शुक्रवार, दि.२५ नोव्हेंबर २०२२ | भारतीय संविधान दिन – जनजागृतीपर व्याख्यान |
| २ | शनिवार, दि.२६ नोव्हेंबर २०२२ | भारतीय संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन व शपथ |
| ३ | शनिवार, दि.२६ नोव्हेंबर २०२२ | संविधान जनजागृती फेरी |

### १. भारतीय संविधान दिन – जनजागृतीपर व्याख्यान :

महिला महाविद्यालय,कराड मधील IQAC आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतीय संविधान दिन" व "स्व.यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी" या दोन्ही कार्यक्रमांचे संयुक्तपणे आयोजन दि. २५ नोव्हेंबर २०२२ रोजी करण्यात आले होते. प्रो.डॉ.भारती पाटील, राज्यशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर या सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.त्यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, संविधानातील तरतुदी,संविधानाचे महत्वव संविधानाबद्दल जनजागृती करणे आज का आवश्यक आहे अशा संविधानाच्या अनेकपैलूंवर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत प्रो.डॉ. इला जोगी, प्राचार्या, महिला महाविद्यालय, कराड यांनी केले.डॉ.पराग सोनटक्के,उपप्राचार्य,महिला महाविद्यालय, कराड, प्रो.डॉ.उज्ज्वला ताठे,समन्वयक, IQAC विभाग यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक

IQAC Co-ordinator
Mahila Mahavidyalaya, Karad

I/c. Principal
Mahila Mahavidyalaya, Karad

प्रो.डॉ.मधुर मोहिते यांनी केले.आभार प्रा.विलास सुर्वे यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अखिलेश शिंदे यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी १६ प्राध्यापक व १४५ पेक्षा अधिक विद्यार्थिनींची उपस्थिती होती.









## २. भारतीय संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन व शपथ -

महिला महाविद्यालय,कराड मधील IQAC आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतीय संविधान दिन" निमित्त शनिवार,दि.२६ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ७:३० वाजता महाविद्यालयात सर्व विद्यार्थिनिंसाठी भारतीय संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले व शपथ घेण्यात आली. प्रा.विलास सुर्वे यांनी भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो.डॉ.इला जोगी यांनी उपस्थितांना भारतीय संविधान याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अखिलेश शिंदे यांनी केले. सदर संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन व शपथ कार्यक्रमात एकूण ३०० पेक्षा अधिक विद्यार्थिनी, प्राध्यापक,सेवक वर्ग सहभागी झाले होते.

IQAC Co-ordinator
Mahila Mahavidyalaya, Karad

I/c. Principal
Mahila Mahavidyalaya, Karad






## ३. संविधान जनजागृती फेरी

महिला महाविद्यालय,कराड मधील IQAC आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतीय संविधान दिन" निमित्त शनिवार,दि.२६ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ८:३० वाजता महाविद्यालयात निवडक विद्यार्थिनींनी सामाजिक समता पर्व ,कराड या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित संविधान जनजागृती फेरी मध्ये सहभाग घेण्यात आला. शिवाजी चौक,कराड येथून छत्रपती शिवाजी महाराज़ यांच्या प्रतिमेस अभिवादन करून या संविधान जनजागृती फेरीस प्रारंभ करण्यात आला.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बुधवार पेठ,कराड येथील प्रतिमेस अभिवादन करून फेरीची सांगता करण्यात आली. विद्यार्थिनीमध्ये संविधानाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने संविधान प्रबोधनपर जनजागृती फ़ेरी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

IQAC Co-ordinator
Mahila Mahavidyalaya, Karad

I/c. Principal
Mahila Mahavidyalaya, Karad









Name of Co-ordinator
Asst. Prof. Akhilesh Shinde

Principal
Prof. Dr. Ila Jogi

**IQAC Co-ordinator**
Mahila Mahavidyalaya, Karad

**I/c. Principal**
Mahila Mahavidyalaya, Karad